# गोमंतकातील मराठी नाट्यलेखन वगैरे : एक चिंतन

- प्रा. बाळकृष्णजी कानोळकर
गोवा विद्यापीठ, मराठी विभाग

माझ्या निबंधाच्या शीर्षकामध्ये हेतूत:च 'गोमंतकातील' असा शब्दप्रयोग केलेला आहे. सर्वसाधारणपणे त्यासाठी उपयोजिण्यात येणाऱ्या 'गोमंतकीय' शब्दाचा प्रयोग मी टाळलेला आहे. कारण माझ्या मते 'गोमंतकीय' हा शब्द हवा तसा वापरून वापरून त्याचे अर्थकंगोरेच आज नष्ट करून टाकण्यात आलेले आहेत. परिणामत: तो गुळगुळीत आणि म्हणूनच स्वत:ची 'अर्थशक्ती' हरवून बसलेला असा नंदीबैलासारखा गुबुगुबु बनलेला आहे. कोणीही काही म्हणा, याची आपली मान हालवून पसंती वा दाद आहेच. 'गोमंतकीय' ही संज्ञा या शब्दप्रयोगातून अभिप्रेत असलेली संकल्पना इतकी बुचकळ्यात टाकणारी आणि म्हणून भूलभुलय्या निर्माण करणारी झालेली आहे की काही विचारू नका. उदाहरणच देऊन बोलायचे झाले तर असे सांगता येईल की 'गोमंतकीय' साहित्यिक कोणास म्हणावे ? असा प्रश्न स्वत:स विचारला तर त्याची उत्तरे कालानुक्रमे सतत बदलत आलेली पहावयास मिळतात. त्यासाठी कधी जन्माचा, तर कधी पूर्वपरंपरेचा, तर कधी वास्तव्याचा निकष लागला जातो. इतकेच नव्हे तर एखादेवेळी कुलदैवताचा देखील निकष काडीचा आधार म्हणून चालतो. एकूण काय तर हे सारे निकष एकसमयावच्छेदे करून किंवा वेगवेगळे परिस्थिती सापेक्ष लावून वापरायचे आणि त्यायोगे प्राप्त करून घ्यायचे फायदे वा मानसन्मान लाटायचे असेच सारे चित्र आहे. आणि म्हणून केवळ 'वास्तव्याचा निकष' जरी विचारात घेतला तर ही कालमर्यादा 'तीन' पासून 'पंधरा' पर्यंत पुढेमागे झालेली पहावयास मिळते. पूर्वजपरंपरेचा वा वारश्याचा 'निकष' लावला की हव्या त्या 'महाभागांना' सामावून घेता येतेच. शिवाय आत्मगौरवाचीही सोय होते.

गोमंतकीय लेखकांचा जेव्हा जेव्हा विचार केला गेला तेव्हा तेव्हा असाच व्यवहार झालेला पहावयास मिळतो आणि ज्या व्यक्तींना गोमंतकीय साहित्यिक म्हणून गौरविण्यात आले त्यापैकी कितीजण सर्वार्थाने गोमंतकीय होते याविषयीचे पितळ आज उघडे पडलेले पहावयास मिळते. असे का झाले ? कारण वास्तवाकडे पाठ करून दिवास्वप्नाच्या सृष्टीत वावरण्याचा हा परिणाम आहे. गोव्यातील मराठी नाट्यलेखनाच्या, नाटककारांच्या बाबतीत तर यासंदर्भात चिंताजनक अशीच स्थिती आहे. नाट्यवेड्या गोव्यात, दरवर्षी हजारोंनी मराठी नाटकांचे प्रयोग होणाऱ्या या प्रदेशात नाव घेण्यासाखा एकही नाटककार का निर्माण होऊ शकला नाही, असा प्रश्न नेहमी उपस्थित केला जातो. परंतु लागलीच या प्रश्नाच्या दाहकतेपासून सुटकारा प्राप्त करण्यासाठी किर्लोस्करांपासून ते रांगणेकरांपर्यंत ते गोमंतकीय

असल्याचे दावे केले जातात. यामध्ये मतकरी आणि जयवंत दळवींचीही भर घालता येईल. या प्रकाराला आत्मवंचना म्हणू नये तर काय म्हणावे ? मराठी नाटकाची गंगोत्री म्हणूनही गोमंतकाची वकिली करण्याचे प्रयत्न यापूर्वी काही महशूरांकडून झालेले आहेतच. मला मात्र नेहमी हा सारा प्रकार हास्यास्पद वाटत आलेला आहे. समोर असलेल्या दाहक सत्याला धैर्याने सामोरे जाण्याचा प्रयत्न आपण केव्हा करणार आहोत ? की 'सांगे जो पूर्वजांची कीर्ती तो एक मुर्ख' असेच चालत राहणार आहे ?

एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर आज आपण येऊन ठेपलेलो आहोत. निदान आतातरी आपल्या या प्रदेशातल्या नाट्यलेखनाच्या (मराठी) दुष्काळाकडे उघड्या डोळ्यांनी आणि खुल्या दिलाने सामोरे जाऊन वस्तुस्थितीचा स्वीकार करण्यात काहीच उणेपणा नाही. कोतेपणा तर नाहीच नाही. गोव्यातील मराठी नाट्यलेखनाची परंपरा भले शेकडो वर्षांची हो! परंतु ज्याने आपल्या नावाची नाममुद्रा मराठी नाट्यलेखनाच्या क्षेत्रात उमटवली असा एक तरी नाटककार आपल्यातून निर्माण झाला आहे का ? कवितेच्या प्रांतात बोरकर, रामाणी आहेत. कथेच्या क्षेत्रात सुखठणकर, सरदेसाई, जोशी, हेबळेकर आहेत. कादंबरीच्या क्षेत्रात भेंडे, बोरकर आहेत. चित्रकलेच्या क्षेत्रात चिमूलकर, दलाल आणि लक्ष्मण पै आहेत. संगीताच्या क्षेत्रात दिनानाथ, मालपेकर, कुर्डीकर, अभिषेकी, आमोणकर असे कितीतरी रथी–महारथी आहेत. आणि या सर्वांना आपापल्या क्षेत्रात स्वत:ची अशी Identity (ओळख) आहे. त्यांच्या कार्याचा, योगदानाचा विचार केल्याशिवाय, त्यांच्या कर्तबगारीची नोंद घेतल्याशिवाय त्या त्या क्षेत्राचा विचारच केवळ अशक्यच. परंतु नाट्यलेखनाच्या क्षेत्रात असे काही नजरेत भरत नाही. हिराबाई पेडणेकर, गोपाळकृष्ण भोबे, ह. वि. देसाई, वसंत कामत अशी काही नावे सांगण्यासाठी म्हणून सांगता येतील. परंतु हे सारेच जण नाटककार म्हणून मराठी रंगभूमीवर पाय रोवून establish होऊ शकलेले नाहीत. हे सत्य आहे. असे का व्हावे ? गोमंतकीय मराठी नाट्यलेखनाच्या संदर्भात हा प्रश्न विचार करावयास लावणारा आहे. परंतु याविषयी विचार करावा असे आपणास कधीच वाटले नाही की त्याची आवश्यकताही वाटली नाही, की हा प्रश्नच मुळात फजुल आहे?

गोवा मुक्त झाल्यावर इथे कला अकादमीची स्थापना झाली. त्यामार्फत दरवर्षी इथे नाट्यस्पर्धांचे आयोजन सातत्याने होत आलेले आहे. याही वस्तुस्थितीला आता पंचवीस वर्षांहून जास्त काळ उलटलेला आहे. या काळात इथे शेकडो मराठी नाट्यप्रयोग स्पर्धेनिमित्त सादर करण्यात आले. दरवर्षी एखाद्या संस्थेला आपला प्रयोग अंतिम नाट्यस्पर्धेत सादर करण्यासाठी मुंबई, पुणे वा सांगली येथे जाण्याचे 'भाग्य' लाभले. आणि आपण दरवर्षी नव्या वा जुन्या नाट्यसंहितांसाठी प्रामुख्याने महाराष्ट्र प्रदेशावरच अवलंबून राहिलो. नाही म्हणायला नाट्यलेखनाचे काही किरकोळ प्रयत्न इथे झाले. त्यात प्रामुख्याने विष्णू सूर्या वाघ, विजयकुमार नाईक, राजू शिंदे, महाबळेश्वर रेडकर, मोरेश्वर मराठे, विद्याधर दाते यांच्या प्रयत्नांचा सहभाग आहे. याशिवाय चार–दोन नावे इतरांचीही घेता येतील. परंतु यामध्ये 'सातत्य आणि दर्जा' या निकषावर किती जण टिकले वा टिकून राहू शकले? केवळ स्पर्धेमध्ये नाट्यलेखनाचे एखादे पारितोषिक, खिरापतवजा

प्राप्त झाले म्हणून कुणी नाटककार म्हणून प्रस्थापित होऊ शकत नाही. यापैकी एका –दोघांनी मुंबईच्या व्यावसायिक नाट्यक्षेत्रात नशीब अजमावण्याचा प्रयत्न देखील करून पाहिला. परंतु हाय रे माझ्या दैवा ! असेच म्हणण्याची पाळी त्यांच्यावर आली. याचाच अर्थ असा होतो की, भले नाट्यस्पर्धमध्ये या लेखकांना पारितोषिक मिळाले असेल, परंतु व्यवसायाच्या स्पर्धेमध्ये टिकण्याचा गुण वा दम (स्टेमिना) त्यांच्या ठिकाणी नाही; हे आपाततः सिद्ध झालेले आहे. असे का व्हावे?

जोपर्यंत आपण आत्मगौरवाच्या गर्तेत खितपत पडलेले राहू आणि स्वत:ला स्वनामधन्य मानत वागू तोवर या दुष्टचक्राचा भेद होणे मोठे कठीण आहे. हे चक्र तोडायचे असेल तर आपणास अंतर्मुख होऊन परखड विचार करावा लागेल. कोणता हा विचार? 'आपल्या लेखनाचा कस कसा वाढविता येईल?' याविषयीचाच हा विचार असेल.

यासंदर्भात माझे एक निरीक्षण मला इथे नोंदवावेसे वाटते. ते म्हणजे उपरोल्लेखित सर्वच नाटककारांजवळ स्वत:ची अशी Originality नाही. 'मौलिकतेचा अभाव' ही त्यांच्या प्रतिभेची दाहक मर्यादा आहे. दुसरी गोष्ट म्हणजे नाट्यलेखनासाठी काही अभ्यास करावा लागतो, काही संशोधन करावे लागते याची सूतराम जाणीव या लेखकांना नाही. कधीतरी गाजलेल्या वा लिहिलेल्या आणि आता विस्मृतीत गेलेल्या नाट्यकृतीच्या नव्या आवृत्त्याच नव्या नावाने, नव्या 'पोषाखात' काढण्याचे प्रयत्नच त्यांच्याकडून झालेले आहेत. जमलेच तर एखाद्या कथा–कादंबरीचे नाट्यात रूपांतर करणे वा त्यातील मूळ कल्पना चोरून उभारण्याचा 'यशस्वी' प्रयत्न करणे असेच या 'प्रतिभे'चे स्वरूप आहे. पुन: मूळ प्रतिभावंताविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचे साधे सौजन्यही या लोकांपाशी असलेले दिसत नाही. असणार कसे? तसे झाले तर यांचे 'चौर्य' उघड पडणार नाही का? आणि मग 'प्रतिभावंत', 'नाटककार' म्हणून समाजात मिरवता येणार नाही. हीच खरी तर यांची मोठी अडचण आहे. गोव्यातील लोकांचे मुळात वाचनच सुमार असल्याकारणाने या 'चोऱ्या–माऱ्या' पचतात. परंतु परिणामत: या लोकांचे 'प्रतिभेचे पोहरे' कोरडे ठणठणीत पडतात. अशी पाडलेली नाटके पहिल्या–दुसऱ्या यशस्वी प्रयोगानंतर पडली नाहीत तरच नवल! आणि 'चोऱ्या–माऱ्या' तरी किती आणि कितीवेळा करावयाच्या? शेवटी प्रत्येक गोष्टीला काही म्हणून मर्यादाही असतेच. उचलेगिरी करणाऱ्याला 'उचल्या' म्हणतात. आणि तुकारामाच्या भाषेत 'हमाल'

असे का व्हावे? 'प्रतिभावंत' नाटककार इथे निर्माण का होऊ नये? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला तेव्हा माझ्यासमोर दोन गोष्टी आल्या त्या म्हणजे, अंधानुकरण आणि अभ्यासाचा अभाव.

अनुकरण करायला हरकत नाही. परंतु अनुकरण सुद्धा एका मर्यादेपर्यंत ठीक आहे. चालण्याची शक्ती पायामध्ये आल्यावर मूल सुद्धा आईचा हात सोडून देते याचे देखील साधे भान या लेखकांना आहे असे दिसत नाही. आणि अनुकरण तरी किती प्रकारचे? कथानक, पात्रयोजना, संवाद, भाषाशैली, रचनातंत्र या सर्वच घटकांचे अनुकरण करून कुणी मोठा नाटककार झाल्याचे माझ्यातरी ऐकिवात वा वाचनात आलेले नाही. अगदी जागतिक कीर्तीचे नाटककार सोडाच, भारतीय वा मराठी नाटककारात असे एकही उदाहरण पहावयास मिळणार नाही. आणि आपले दुर्दैव असे की हे आपले नाट्यलेखक ज्या मराठी

नाटककारांचे अनुकरण करतात ते तरी कुठे मोठे नाटककार आहेत. ते तर सर्वार्थाने परपुष्ट नाटककार आहेत. गडकऱ्यांपासून ते शिरवाडकरांपर्यंत याला अपवाद नाहीत. म्हणजे त्यांनीच (म्हणजे आपल्या गोमंतकीय नाटककारांना वाटणाऱ्या नाटककारांनी) कुणाच्या तरी प्रतिभेच्या आडातून आपला पोहरा भरून घ्यावा, त्यांच्या पोहऱ्यातून आणखी कुणीतरी आपला चिंबू भरून घ्यावा आणि या चिंबूतून यांनी आपला पसा भरून घ्यावा आणि त्या पसाभर प्रतिभेने रसिकांची तहान भागविण्याचा केविलवाणा प्रयत्न करावा असे हे दरिद्री वास्तव आहे. कुणाचीतरी कृती घेऊन त्यावर आपली 'कलाकृती' बेतावी वा बेतण्याचा प्रयत्न करून पहावा अशीच एकूण परिस्थिती आहे. अशा 'बेतणाऱ्यांना' कलावंत म्हणत नाहीत. ते असतात कारागीर. ड्रेस डिझाइनर भले कलावंत असतील. परंतु त्यावर हुकूम असतो तो बेतून, मापून घेऊन कपडे शिवणाऱ्याचा. जो त्याचा 'दर्जा' तोच या आमच्या नाटककारांचा. यावर कुणी म्हणेल, मग त्यांना लेखनाची पारितोषिके कशी काय मिळतात? याची उत्तरे दोन. एक वासैरात लंगडी गाय शहाणी. आणि दोन, भाषिक राजकारण. राजकारण डावपेच. या अर्थाने ही पारितोषिके महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती संचालनालयामार्फत दिली जातात. कारण या नाट्यस्पर्धाच मुळी या संस्थेशी संलग्न असतात. याच्यातील खोच लक्षात घेण्याचा, जाणून घेण्याचा प्रामाणिक, कोणत्याही ग्रहविग्रहापासून अलिप्त राहून विचार केला तर मला काय म्हणायचे आहे हे सहजपणे लक्षात येईल.

आता दुसऱ्या मुद्याकडे वळू. उपरोल्लेखित गोमंतकीय नाटककारांपैकी आणि त्यांच्या बरोबरीने नाटककार होऊ पाहाणाऱ्यांना मला असे विचारावेसे वाटते की, बाबानो, यासाठी तुम्ही काही 'स्वाध्याय' करता का? की 'धन्याचा हा माल । मी तो हमाल भार वाही ॥' याच्यातच तुम्ही स्वत:ला धन्य मानणार आहात? किती दिवस दुसऱ्यांच्या आणि स्वत:च्याही डोळ्यात धूळफेक करत राहाणार आहात? शक्यता आहे, यावर बरेचजण म्हणतील, 'स्वाध्याय म्हणजे काय? आणि काही असलाच तर त्याची यासाठी आवश्यकता काय?' ज्या गडकऱ्यांना तुम्ही श्रेष्ठ नाटककार मानता तोही आयुष्याच्या अखेरपर्यंत नाट्यलेखनासाठी, मौलिक नाट्यलेखनासाठी स्वाध्याय करतच होता, हे कदाचित तुम्हाला ठाऊकच नसावे. ज्याला स्वाध्याय करूनही जे मिळविता, संपादन करता आले नाही ते तुम्ही त्याच्या सहीसही नक्कली गिरवून साध्य करू पहात असाल तर त्याला काय म्हणावे? मुळात नाट्यलेखन हा सर्व साहित्यप्रकारात अत्यंत कठीण असा प्रकार आहे याची तरी जाणीव असावी लागते. केवळ संवाद लिहिणे वा उतरून काढणे वा फिरवून घेणे आणि 'खर्डे' तयार करणे म्हणजे नाटक लिहिले असे म्हणता येणार नाही. त्यासाठी 'नाटक' म्हणजे काय हे अगोदर जाणून घ्यावे लागते. आपल्या मनोभूमीत पडलेल्या एखाद्या, (पडले असले तरच) नाट्यबीजाच्या 'Diagnoses' कराव्या लागतात. आणि त्याला त्याबरहूकूम 'Treatment'द्यावी लागते. तरच औषध पारते. यश आणि आनंद प्राप्त होतो. औषधाच्या दुकानातून गोळ्या आणून घेण्याने प्रसंगी प्राणासही मुकावे लागते. हा साधा व्यवहार कुणालाही कळून येण्यास कठीण नाही. त्यासाठी दुराभिमान मात्र बाजूला ठेवावा लागतो.

नाट्यलेखन करण्यापूर्वी कथानक परिपोषाचा,

रचनातंत्राचा, पात्रपरिपोषाचा, भाषा वळवण्याचा आणि वाकवण्याचा, संवादलेखनाचा, प्रयोगक्षमतेचा आपण किती आणि कसा विचार करत असतो? असा प्रश्न संबंधितांनी स्वत:लाच विचारून पहावा. एवढ्याने भागत नाही. आपल्या भाषिक परंपरेचा, सांस्कृतिक वारशाचा, सामाजिक वास्तवाचा, नाटकाच्या उत्क्रांतीचा धांडोळा घेऊन सतत चिंतन–मनन करणे आवश्यक आहे असे कुणाही नाट्यलेखकाला वाटत आहे का ? जर या प्रश्नांचे उत्तर नकारार्थी असेल तर आपल्या हातून अप्रतिम, अपूर्व अशी नाट्यकृती कशी निर्माण व्हावी? ज्या मराठी नाट्यलेखनाचा कित्ता आपण गिरवून मोठे होण्याची स्वप्ने पाहत आहोत तिथे तरी कुणी असा आदर्श, प्रतिभावंत नाटककार तुमच्या समोर आहे का ? बंगालीत बादल सरकार आहे. हिंदीत धर्मवीर भारती आहे, मोहन राकेश आहे, कानडीत गिरीश कर्नाड आहे. मराठीत कोण आहे? तेथले तुमच्या समोर असलेले नाटककार नाटककार म्हणून थिटे आहेत. आहेत तिथेही जे काही मेजके एक–दोन त्यांचे तुम्ही अनुकरण करंणार आहात काय ? तर मग चि. त्र्यं. खानोलकरांचे करा, गो. पु. देशपांडेंचे करा. आळेकरांचे करा. जमेल ? नाही ना ? मग गडकरी, परदेशी, शिरवाडकर, दळवी यांची अनुकरणे सोडून द्या आणि गप्प बसा. त्यांनी मराठीत छापलेल्या नाटकांचीच इथे मराठीत आवृत्ती काढायची काही आवश्यकता आहे काय?.

मला ठाऊक आहे की मी हे अट्टाहासाने लिहीत आहे. परंतु दुराग्रहाने नाही. मानहानी करण्याचा उद्देश तर यामागे चुकूनही नाही. ही वस्तुस्थिती आहे. आणि कुणी तरी हे मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्याचे काम करायलाच पाहिजे होते. मी ते करण्याचा प्रयत्न केलेला आहे. निदान या घंटेच्या निनादातून निघणारा ध्वनी तरी माझ्या होतकरू गोमंतकीय नाट्यलेखक बांधवांना अंधानुकरणाच्या गर्तेत स्वत:ला झोकून देण्याच्या वृत्तीपासून सावध करील आणि प्रतिभेच्या आत्मसाक्षात्कारातून देदीप्यमान, प्रभावी, स्वयंभु अशी एखादी तरी नाट्यकृती उमलून येईल, या अपेक्षेने हे अंजन लावण्याचा आततायीपणा मी करत आहे. समर्थ नाटककाराच्या उदयाच्या प्रतिक्षेत !

०००